केंद्र पुरस्कृत बहुक्षेत्र विकास कार्यक्रमातंर्गत (MsDP) मान्यता प्राप्त यवतमाळ जिल्ह्यातील नेर गटातील मान्यता प्राप्त विकासकामांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र-राज्य हिश्श्यांतर्गत मंजूर उर्वरित ५०% अनुदान वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः अविवि-२०१७ /प्र.क्र.४७/का.०७,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: - २१ /०९/२०१७

संदर्भ: -(१) अवर सचिव, अल्पसंख्याक कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.३/१२/२०१५-MsDP, दि.१७/१२/२०१५.
(२) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र.अविवि-२०१४/ प्र.क्र.१४१/ का.७, दि.३१ मार्च, २०१६.
(३) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. अविवि-२०१४/ प्र.क्र.१४१/ का-७, दि.३०/०४/२०१६.
(४) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. अविवि-२०१४/प्र.क्र.१४१/का-७, दि.०६/०६/२०१६.
(५) जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे पत्र क्र.क.लि/अल्पसं/२३५०/२०१७, दि. १२/०६/२०१७.
(६) अवर सचिव, अल्पसंख्याक कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.३/१३(७)/२०१३-PP, दि.२३/१२/२०१५.
(७) अवर सचिव, अल्पसंख्याक कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.३/१३(७)/२०१३-PP, दि.२२/०८/२०१७.

प्रस्तावना :-

१२ व्या पंचवार्षिक योजनेत केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाच्या बहुक्षेत्रिय विकास कार्यक्रमांतर्गत (MsDP) गठित शक्तिप्रदान समितीने दि १४/१२/२०१५ रोजीच्या १०६ व्या बैठकीत यवतमाळ जिल्हयातील नेर गटातील शाळा इमारत बांधकाम,अतिरिक्त वर्ग खोल्या बांधकाम, तसेच आंगणवाडी बांधकामासाठी एकूण रु.२३३.९२ लाख इतक्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. केंद्र शासनाने संदर्भ क्र. (६) येथील आदेशाद्वारे MsDP अंतर्गत विषयांकित गटातील मान्यताप्राप्त विकासकामांच्या अंमलबजावणीसाठी मंजूर केंद्र हिश्श्यातील पहिल्या टप्प्यातील एकूण रु. ७०,१६,०००/- इतकी रक्कम तसेच संदर्भ क्र. (२) अन्वये राज्य हिश्श्यातील रु. ४६,७८,०००/- इतकी रक्कम जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना मंजूर करुन वितरित करण्यात आली आहे. संदर्भ क्र. (४) येथील शासन निर्णयांन्वये यवतमाळ जिल्ह्यातील विषयांकित ०४ प्राथमिक शाळा, ०२ अतिरिक्त वर्ग खोल्या,०१ अंगणवाडी केंद्र बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

आता संदर्भ क्र. (५) येथील पत्रातील विनंतीस अनुसरुन, केंद्र शासनाकडून संदर्भ क्र. (७) येथील पत्रान्वये मंजूर करण्यात आलेली केंद्र हिश्श्यातील उर्वरित ५०% रक्कम यवतमाळ जिल्ह्यातील नेर गटातील विषयांकीत ०४ प्राथमिक शाळा, ०१ अंगणवाडी केंद्र बांधकामासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांना मंजूर करुन वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाकडून संदर्भ क्र. (७) येथील पत्रान्वये केंद्र हिश्श्यातील उर्वरित ५०% म्हणजेच रु.६६.८६ लक्ष तसेच राज्य हिश्श्यातील उर्वरित रु.४४.५८ लक्ष इतकी रक्कम यवतमाळ जिल्हयातील नेर गटासाठी विषयांकीत बांधकामांसाठी मंजूर करण्यात आली आहे. सदरहू रक्कम जिल्हाधिकारी यवतमाळ यांना खालील तक्त्यातील स्तंभ क्र. (१०) व (११) प्रमाणे मंजूर करुन वितरित करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे :-

(Rs. lakhs)

Sl. No.	Name of project	No. of units	Unit Cost	Sharing ratio	Central share	State share	Total cost	GOI 1st install. Released	GOM 1st install. Released	2nd instalment to be released (GOI)	2nd instalment to be released (GOM)
	1	2	3	4	5	6	7	8	9	10	11
1	Construction of new primary school bulding at Ner Primary Marathi School, Old cotton Market , Yavatmal	01	78.01	60:40	46.80	31.20	78.01	23.40	15.60	23.40	15.60
2	Construction of new primary school bulding at Ner Primary Urdu School, Nababpura	01	44.65	60:40	26.79	17.86	44.65	13.39	8.93	13.39	8.93
3	Construction of new primary Urdu school bulding at Ner Primary Urdu School, Khidkipura	01	66.11	60:40	39.66	26.44	66.11	19.83	13.22	19.83	13.22
4	Construction of new primary school bulding at Ner Primary Urdu 01School,Pathanipura ,	01	29.65	60:40	17.79	11.86	29.65	8.89	5.93	8.89	5.93
5	Constructon of ACRs	02		60:40	6.60	4.40	11.00	3.30	2.20	0	0
6	Constructon of AWC	01	4.5	60:40	2.70	1.80	4.50	1.35	0.90	1.35	0.90
	TOTAL				**140.34**	**93.56**	**233.92**	**70.16**	**46.78**	**66.86**	**44.58**

४. उपरोक्त तक्त्यातील स्तंभ क्र.(१०) प्रमाणे सन २०१६-१७ या वर्षात बहुक्षेत्रिय विकास कार्यक्रमांतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील नेर गटातील विकासकामांसाठी उर्वरित रु.६६.८६ लाख (रुपये सहासष्ठ लाख श्याऐंशी

हजार मात्र) तसेच राज्य हिश्श्यातील रु ४४.५८ लाख (रूपये चव्वेचाळीस लाख अठ्ठावन्न हजार मात्र) एवढी रक्कम जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना सुपूर्द करण्यात येत असून याकरिता ते आहरण व संवितरण अधिकारी आणि नियंत्रक अधिकारी म्हणून काम पाहतील.

५. सन २०१७-१८ या वर्षात जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना उपरोक्त तक्त्यातील स्तंभ क्र.(१०) व (११) प्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या एकूण रकमेच्या मर्यादेत अर्थसंकल्प वितरण प्रणालीतून सदर रक्कम आहरित व संवितरित करण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी बहुक्षेत्रीय विकास कार्यक्रमांतर्गत विषयांकित ०४ प्राथमिक शाळा , ०१ अंगणवाडी केंद्र बांधकामासाठी या योजनेकरीता आहरित केलेली रक्कम संबंधित अमंलबजावणी यंत्रणेस रितसर वितरित करावी.

६. केंद्र शासनाच्या अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाच्या दि.१६/०२/२०१५ रोजीच्या पत्रातील सूचनांनुसार बहुक्षेत्रिय विकास कार्यक्रमाअंतर्गत (MsDP) वितरीत करण्यात येणा-या निधीस VAT वा कोणत्याही प्रकारचे विभागीय कर लागू राहणार नाहीत.

७. सदरचा खर्च करण्यास वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत C.V.C च्या मार्गदर्शक तत्वानुसार / CAG च्या निर्देशानुसार कोणताही शासन निर्णय / अटी व शर्तीचा भंग होणार नाही, याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी यांनी घ्यावी. सदर रक्कम वितरित करण्यापूर्वी संबंधित जिल्हाधिकारी यानी शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय / कार्यालयीन आदेश / वित्तीय नियमावली / सार्वजनिक बांधकाम विभागाची कार्यनियमावली / भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे निरिक्षण अहवाल / वित्तीय कार्यपध्दती यांचा अवलंब करावा. तसेच सदर रक्कम चालू आर्थिक वर्षात उपयोगात आणणे आवश्यक राहील. सदर निधी कोणत्याही संस्थेत ठेव स्वरुपात जमा करता येणार नाही.

८. अमंलबजावणी यंत्रणा यांनी विषयांकीत ०४ प्राथमिक शाळा, ०१ अंगणवाडी केंद्र बांधकामासाठी केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीच्या विनियोगाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे तसेच त्रैमासिक अहवाल (QPR) विहित नमुन्यात (अद्ययावत छायाचित्रांसह) संबंधीत जिल्हाधिकारी यांच्यामार्फत शासनास सादर करावीत. तसेच विभागाच्या Construction tracker प्रणालीवर देखील विषयांकीत वसतीगृह बांधकामाची माहिती वेळोवेळी upload करावी.

९. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी विषयांकीत ०४ प्राथमिक शाळा, ०१ अंगणवाडी केंद्र बांधकामासाठी निधी मागणीच्या प्रस्तावासोबत वरीलप्रमाणे विहित नमुन्यातील निधीच्या विनियोगाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे तसेच त्रैमासिक अहवाल (QPR) (अद्ययावत छायाचित्रासह) शासनास सादर करावीत.

१०. सदर योजनेंतर्गत केंद्र हिश्श्यावर होणारा खर्च "मागणी क्र.झेड ई-१, मुख्यलेखाशीर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, २०० इतर कार्यक्रम, केंद्र पुरस्कृत योजना (००) (१७) अल्पसंख्याक बहुल क्षेत्रासाठी बहुक्षेत्रीय विकास योजना, (केंद्र हिस्सा) (२२३५- ए ५४३) ३१ सहायक अनुदान (वेतनेतर)" या लेखाशीर्षाखाली व राज्य हिश्श्यावर होणारा खर्च "मागणी क्र.झेड ई-१, मुख्यलेखाशीर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, २०० इतर कार्यक्रम, केंद्र पुरस्कृत योजना (०१) (१४) अल्पसंख्याक बहुल क्षेत्रासाठी बहुक्षेत्रीय विकास योजना, (राज्य हिस्सा) (२२३५-ए २३१) ३१ सहायक अनुदान (वेतनेतर)" मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

११. हा शासन निर्णय वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३०/०६/२०१७ अन्वये प्रशासनिक विभागांस प्रदान करण्यात आलेल्या अधिकांरानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१७०९२११६०५३४७९१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashok Hari Gaikwad

Digitally signed by Ashok Hari Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=MINORITY DEVELOPMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9bcd09896471a6f90b80581ca42d45e27f07ad7e99a45bec3a7579cf10330fcd, cn=Ashok Hari Gaikwad
Date: 2017.09.21 15:57:44 +05'30'

(अशोक गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव,शालेय शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई.
२. प्रधान सचिव, महिला बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. विभागीय आयुक्त, अमरावती.
४. उप सचिव, मा. मुख्य सचिव यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खासगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
६. जिल्हाधिकारी, यवतमाळ.
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ.
८.आयुक्त, एकात्मिक बाल विकास केंद्र, रायगड भवन, नवी मुंबई.
९.उप मुख्य कार्यकारी अधिकारी(महिला बाल विकास), जिल्हा परिषद, यवतमाळ.
१०.महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
११.महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा व परीक्षा) मुंबई/नागपूर.
१२.मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अमरावती
१३.अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, यवतमाळ
१४.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, यवतमाळ
१५. संचालक, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पुणे.
१६.संचालक, अल्पसंख्यांक व प्रोढ शिक्षण संचालनालय,पुणे.
१७.जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा यवतमाळ.
१८.वित्त विभाग (अर्थसंकल्प -४/ व्यय -४) मंत्रालय, मुंबई.
१९.नियोजन विभाग (कार्या.१४७५) मंत्रालय, मुंबई.
२०.निवडनस्ती,(का.७).